# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)


संदर्भ: विविमं/२०१९–२०/३५४ **अत्यंत महत्वाचे** दिनांक : १६/०८/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग.

विषय: विद्यार्थी परिषद निवडणूक पुढे ढकलण्याबाबत.
संदर्भ : उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई कार्यालयाचा दि. १४ ऑगस्ट, २०१९ चा आदेश.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९९ च्या पोटकलम (१) मध्ये विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि अधिक चांगल्या प्रकारच्या सामुदायिक जीवनासाठी विविध विद्यार्थी संघांच्या पाठयेतर कार्यक्रमाचे प्रचालन करण्याकरिता व त्याबाबतीत समन्वय साधण्याकरिता, विद्यापीठाच्या विभागाकरिता एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठाच्या प्रत्येक संचालित महाविद्यालय किंवा परिसंस्था आणि प्रत्येक संलग्न महाविद्यालय यांच्याकरिता एक महाविद्यालय विद्यार्थी परिषद घटीत करण्याची तरतूद आहे, आणि म्हणून उक्त परिषदेच्या निवडणूका घेण्याची रीतीची तरतूद केली आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थां, विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांकरिता विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात आला होता.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम. २०१६ (सन २०१७ चा महा.६) याच्या कलम ९९ ख च्या पोट–कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने याद्वारे, विद्यार्थी परिषदेच्या निवडणूका दिनांक ३० नोव्हेंबर,२०१९ पर्यत पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

संचालक,(अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

सोबत : वरीलप्रमाणे.

# आदेश

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०००३२
दिनांक :- १४-०८-२०१९.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम. २०१६

क्रमांक विपनि-२०१९/प्र.क्र. २२९/ विशि-३ **ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा.६) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) याच्या कलम ९९ च्या पोटकलम (१)मध्ये. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि अधिक चांगल्या प्रकारच्या सामुदायिक जीवनासाठी विविध विद्यार्थी संघांच्या पाठ्येतर कार्यक्रमाचे प्रचालन करण्याकरिता व त्याबाबतीत समन्वय साधण्याकरिता, विद्यापीठाच्या विभागाकरिता एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठाच्या प्रत्येक संचालित महाविद्यालय किंवा परिसंस्था आणि प्रत्येक संलग्न महाविद्यालय यांच्या करिता एक महाविद्यालय विद्यार्थी परिषद घटीत करण्याची तरतूद आहे , आणि म्हणून उक्त परिषदेच्या निवडणूका घेण्याच्या रीतीची तरतूद केली आहे;

**आणि ज्याअर्थी,** विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेच्या निवडणूका ऑगस्ट- सप्टेंबर, २०१९ या कालावधीमध्ये घेतल्या जाण्याची शक्यता आहे;

**आणि ज्याअर्थी,** सततधार पावसामुळे राज्यातील वेगवेगळया भागांमधील पुर परिस्थिती निर्माण झाल्याने राज्यातील विविध विद्यापीठांच्या विद्यार्थी परिषदेच्या निवडणूका घेणे अशक्य झाले आहे,

**आणि ज्याअर्थी,** विद्यमान १३ व्या महाराष्ट्र विधानसभेची मुदत समाप्त होत असल्याने, महाराष्ट्रची नविन विधानसभा घटीत करण्यासाठी घेण्यात येणारी निवडणूक त्याच काळात घेतली जाण्याची शक्यता आहे , आणि सप्टेंबर, २०१९ मध्ये उक्त निवडणूकीची अचारसंहिता लागू होईल आणि निवडणूका प्रचारालाही सुरुवात होईल;

**आणि ज्याअर्थी ,** उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने , विद्यापीठांच्या विद्यार्थी परिषदेच्या निवडणूका दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ पर्यत पुढे ढकलणे इष्ट वाटते ;

**त्याअर्थी,** आता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम. २०१६ (सन २०१७ चा महा.६) याच्या कलम ९९ ख च्या पोट-कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन , महाराष्ट्र शासन याव्दारे, विद्यार्थी परिषदेच्या निवडणूका दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ पर्यत पुढे ढकलीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सौरभ विजय)
शासनाचे सचिव

# ORDER

Higher and Technical
Education
Department, Madame Cama
Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai-400 032
Dated the 14th August, 2019

**Maharashtra Public Universities Act, 2016**

No.Vipani-2019/C.R.229/U.E.3 – Whereas sub-section (1) of section 99 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. VI of 2017) (hereinafter referred to as the "said Act") provides for constitution of the University Students Council consisting of a university department Students Council for the Departments of the university and college Students Council for each conducted college or institution of the University and each affiliated college, to look after the welfare of the students and to promote and co-ordinate the extra-curricular activities of different student's associations for better corporate life, and therefore, provides the manner of holding elections to the said Councils;

And whereas, the elections to the Students Council of the Universities are likely to be held during the period of August to September, 2019;

And whereas the flood situation in various parts of the State, due to incessant rains, it is difficult to conduct the elections to the Students Council of the various Universities of the states:;

And whereas, due to expiry of the term of the existing 13th Maharashtra Legislative Assembly, the election for constituting new Maharashtra Legislative Assembly are likely to be held during the same period and the Model Code of Conduct for the said election would be operative and election campaign would also begin in the month of September 2019;

And whereas, in view of the above circumstances for maintaining the Law and Order, it is expedient to postpone the elections to the Students Council of the Universities till the 30th November, 2019.

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sub-Section (1) of Section 99 B of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. VI of 2016) Government of Maharashtra hereby postpone the elections to the Students Council till the 30th November, 2019.

By Order and in the name of the
Governor of Maharashtra,

Secretary to Government